भारतातील हरितगृह क्षेत्रासंबधी शासकीय धोरण- एक अभ्यास

श्री. प्रविण भाऊसाहेब विखे.
संशोधक विद्यार्थी, (व्यावसायिक अर्थशास्त्र),
वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

१. प्रास्ताविक

भारत हा कृषीप्रधान देश असून शेती हा इथला मुख्य व्यवसाय आहे. भारतातील हवामान कडधान्य पिकासाठी उपयुक्त आहे. परंतु फळे, फुले, व भाजीपाला यांचे उत्पादन बरेचसे वातावरणीय घटकांवर अवलंबून आहे. भारतीय वातावरणाचा विचार करता इथल्या हवामानात बरीच विविधता आढळून येते. आपल्याकडे बाराही महिने मुबलक सूर्यप्रकाश उपलब्ध असला तरी सूर्यप्रकाशाची तीव्रता ही ऋतुनुसार बदलत असल्याने मिळणारा सूर्यप्रकाश सर्व पिकांना पोषक असतोच असे नाही. त्याचा पिकाच्या वाढीवर व उत्पादनावर परिणाम हा होतोच. त्यामुळे या पिकांचे यशस्वी नियोजन करण्यासाठी हरितगृहासारख्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे ठरते.

हरितगृहामधील लागवडीचे फायदे आणि मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये त्याचे उज्ज्वल भवितव्य यांचा विचार करून केंद्र तसेच राज्य शासनाने हरितगृह उभारणीसाठी सढळ हाताने मदत करण्याचे ठरवले आहे. केंद्र व राज्य सरकारने हरितगृह लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्याखालील क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने वेगवेगळया योजना आखल्या आहेत.

२. अभ्यासाची उदिष्टये

- हरितगृह उभारणीसाठी शासनाच्या सहभाग याचा आढावा घेणे.
- वर्गीकरणानुसार शासनाच्या कर्ज व अनुदान योजनाचा आढावा घेणे.
- हरितगृहासाठी शासनाच्या विविध कर्ज व अनुदान योजना अभ्यासणे.

३. संशोधन पद्धती

प्रस्तुत अभ्सासासाठी प्रामुख्याने द्वितीय स्त्रोताद्वारे माहिती व आकडेवारीचा वापर केला आहे. यासाठी विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, गोडवा मासिक, शेतकरी मासिक, महाराष्ट्र शासनाने हरितगृह शेती संबंधीचे विविध शासन निर्णय, वर्तमान पत्रातील लेख, विविध संकेतस्थळे, या स्त्रोतामधून संकलित करण्यात आली आहे.

४. हरितगृह उभारणीसाठी शासनाचा सहभाग

हरितगृह शेतीचे फायदे आणि मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये त्याचे उज्ज्वल भवितव्य यांचा विचार करून केंद्र तसेच राज्य शासनाने हरितगृह उभारणीसाठी मदत किंवा साह्य करण्याचे ठरवले आहे. शासनाने यावर संशोधन करून असे निष्कर्ष काढले की, हरितगृहामुळे टनाचा बंदोबस्त आणि पर्यायाने पाण्याची बचत करण्यासाठी प्लॉस्टीकचे किंवा जाळीचे जमिनीवर आच्छादन करून फुले, फळे, भाजीपाला, याची उत्पादन क्षमता ५०% ने वाढवता येते. त्याची या हरितगृहाच्या प्लॉस्टिक पेपरवर शासनाने ५०% सबसिडी सुद्धा जाहीर केलेली आहे. आपल्या देशातील विविध कृषी क्षेत्रामध्ये वापर या विषयातील संशोधन करण्यासाठी संशोधन केंद्रें शासनामार्फत ज्याठिकाणी फलोद्यान पिकाखालील जास्तीत जास्त क्षेत्र आहेत. तेथे विकसित करण्यात आलेले आहे. त्यामूळे अशा केंद्राचा शेतकऱ्याना हरितगृह शेतीविषयक मार्गदर्शन करण्यासाठी आणि कृषी खात्याचा विस्तार विभागाला नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोचवण्यास मदत होईल.

५. हरितगृह उभारणीसाठी शासनाच्या विविध कर्ज व अनुदान योजना

केंद्र सरकारने हरितगृह लागवडीला प्रोत्सहन देण्यासाठी आणि त्याखालील क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने वेगवेगळया योजना आखल्या आहेत. त्या अंतर्गत खालील प्रमाणे

- कमी खर्चाचे आणि हवामन नियंत्रित नसणारे हरितगृह (GH १)
- थोडया प्रमाणात हवामान नियंत्रित असणारे आणि मध्यम खर्चाचे हरितगृह (GH २)
- हवामानाचे संपूर्ण नियंत्रण असणारे जास्त खर्चाचे हरितगृह (GH ३)

हरितगृह प्रकार	रूपये
GH १	३१,५००/-
GH २	१लाख
GH ३	१ लाख

संदर्भ -नॅशनल हॉर्टीकल्चर बोर्ड वार्षिक अहवाल २०१५

या प्रकारे अर्थसहाय्य केंद्रसरकारने हरितगृहासाठी जाहीर केलेले आहे.

अ.नं	राज्य	अनुदान
१	गुजरात	६५
२	मध्यप्रदेश	५०
३	महाराष्ट्र	५०
४	उत्तरप्रदेश	५०
५	राजस्थान	५०
६	गोवा	४०

संदर्भ -नॅशनल हॉर्टीकल्चर बोर्ड वार्षिक अहवाल २०१५

६. वर्गीकरणानूसार शासनाच्या कर्ज व अनुदान योजना

१. केंद्रपुरस्कृत पुष्पोउत्पादन विकास योजना

या योजनेत झेंडू, शेवंती, ॲस्टर, निशिगंध, गूलाब, अशा पारंपारिक फुलांबरोबर जरबेरा, कार्नेशन, गुलाब, ग्लॅडिमोलस अशा अपारंपारिक फुलांची देशांतर्गत तसेच आंतराष्ट्रीय पातळीवर वाढती मागणी लक्षात घेता या फूलांच्या उत्पादनास प्रोत्साहन मिळावे यासाठी केंद्रशासनाच्या वतीने पुष्पोत्पादन योजना राबवली आहे.

योजनेचे उदिष्टये

- क्षेत्रविस्तार
- कंदापासून क्षेत्रविस्तार
- बियाणापासून लागवड
- उच्च्य तंत्रज्ञान क्षेत्रांना भेटी
- फुलांच्या हाताळणी केंद्रासाठी अर्थसहारय्य
- फुलांच्या मूल्यवृध्दीसाठी अर्थसाह्य

२. शीतगृह अनुदान योजना

- लाभार्थी
- अर्थसाह्याचे स्वरूप

३. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

महाराष्ट्र राज्यात २००५-०६ साली राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची सुरूवात करण्यात आली. स्थापनेच्या वर्षात या अभियानात २३ जिल्हे समाविष्ट होते. त्याच्या दुसऱ्या वर्षी अणखी ६ जिल्हयांचा समावेश झाला. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान २०११-१२ पर्यंत सुरू राहणार आहे. अभियान कालावधीच्या सात वर्षात देशातील फलोत्पादन क्षेत्राचे उत्पादन दुप्पट करणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य निर्माण करणे, नवीन फळबागांची लागवड करणे, जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे, सामूहिक शेततळयांच्या माध्यमातून सिंचन क्षमता वाढवणे, हरितगृह, शेडनेटमध्ये नियंत्रित शेतीउत्पादन घेणे, सेंद्रिय शेती, मनुष्यबळ विकास, काढणीत्तोर व्यवस्थापन या बाबींवर अर्थसहाय्य दिले जाते.

जिल्हास्तरावर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान समिती स्थापन करण्यात आलेली असून जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव काम पाहतात.

अ. गूणवत्तापूर्ण लागवड साहित्य लागवड उत्पादन करणे.

राज्यात शासकीय रोपवाटिका, कृषी विद्यापीठांच्या रोपवाटिका व खाजगी रोपवाटीका लागवड साहित्य तयार करतात. अभियानाअंतर्गत खाजगी क्षेत्रात तसेच सार्वजनिक क्षेत्रात मोठया रोपवाटिका (४ हेक्टर क्षेत्रावर) तयार करण्यासाठी १०० टक्के म्हणजे १८.०० लक्ष रू. व लहान रोपवाटीका (१ हेक्टर क्षेत्रावर) तयार करण्यासाठी ३.०० लक्ष रू. एवढया अर्थसहाय्याची तरतूद करण्यात आली आहे. खाजगी क्षेत्रासाठी ५० टक्के किंवा अनुक्रमे कमाल रू. ९.०० लाख व १.५० लाख रू. अर्थसहाय्य देय आहे. खाजगी क्षेत्रासाठी प्रकल्प बँक कर्जाशी निगडीत असणे गरजेचे आहे.

ब. ऊती संवर्धन प्रयोग शाळाचे बळकटीकरण

सार्वजनिक क्षेत्रातील ऊतीसंवर्धन प्रयोगशाळांचे बळकटीकरण करून ऊतीसंवर्धन तंत्रज्ञानाद्वारे तयार केलेले लागवड साहित्य मुबलक प्रमाणात शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी १०० टक्के, कमाल रू. ८.०० लक्ष प्रति प्रयोगशाळा एवढे अर्थसहाय्य दिले जाते. खाजगी क्षेत्रातील ऊतीसंवर्धन प्रयोगशाळांच्या बळकटीकरणासाठी प्रकल्पाच्या ५० टक्के किंवा कमाल रू. ४.०० लक्ष एवढे अर्थसाहाय्य दिले जाते.

क. भाजीपाला बीजोत्पादन कर/ कार्यक्रम

भाजीपाला पिकाची उत्पादकता वाढवण्यासाठी दर्जेदार बियाणे महत्त्वाचे असल्याने भाजीपाला पिकांच्या बियाणे/ रोपे उत्पादन कार्यक्रमासाठी तसेच उत्पादन/ प्रतवारी, प्रक्रिया यासाठीच्या साधनसामग्री सुविधांसाठी या अभियानाअंतर्गत सार्वजनिक क्षेत्रासाठी १०० टक्के, कमाल रू. ५०,०००/- प्रति हेक्टर व खाजगी क्षेत्रासाठी ५० टक्के कमाल रू. २५०००/- प्रति हेक्टर जास्तीत जास्त ५ हेक्टर क्षेत्रासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले जाते. भाजीपाला बीजोत्पादनाच्या सोयी-सुवीधा निर्माण करण्यासाठी प्रकल्प तत्त्वार सार्वजनिक क्षेत्रासाठी प्रकल्प किंमतीच्या १०० टक्के तर खाजगी क्षेत्रासाठी २५ टक्के अर्थसाहाय्य दिले जाते. खाजगी क्षेत्रासाठी अनुदान देताना ते बँकेने मंजूर केलेल्या कर्जाच्या परताव्याच्या स्वरूपात दिले जाते.

फुलशेती

फुलपिकाच्या लागवडीसाठी दांडयाची फुले, कंदवर्गीय फुले व सुटी फुले असे गट तयार करण्यात आले. असून दांडयाच्या फुलांच्या लागवडीसाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांना ५० टक्के कमाल रू. ३५००० प्रति हेक्टर प्रति

लाभार्ती २ हेक्टर क्षेत्रासाठी तर इतर शेतकऱ्यांना ३३ टक्के कमाल रू. २३,१०० प्रति हेक्टर प्रति लाभार्थी, ४ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत अनुदान मिळू शकते.

कंदवर्गीय फुलांच्या लागवडीसाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांना ५० टक्के, कमाल रू ४५,००० प्रति हेक्टर, प्रति लाभार्थी २ हेक्टर क्षेत्रासाठी तर इतर शेतकऱ्यांना ३३ टक्के कमाल रू. २९,७०० प्रति हेक्टर, प्रति लाभार्थी ४ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत अनुदान मिळू शकते.

काढणीत्तोर व्यवस्थापन

फुलोत्पादनानंतर काढणी व काढणीत्तोर व्यवस्थापनात सुमारे ३० टक्के कृषीमालाचे नुकसान होते. ते टाळण्यासाठी त्याची हाताळणी योग्यप्रकारे करण्याची आवश्यकता आहे. अभियानाअंतर्गत या बाबीवर विशेष भर देण्यात आला असून पॅक हाऊससाठी २५ टक्के किंवा ६२,५०० रू. प्रति युनिट, शीतगृहासाठी २५ टक्के, कमाल रू ५० लक्ष प्रति युनिट प्रति ५००० टन क्षमता, वातानुकुलित वाहनव्यवस्थेसाठी २५ टक्के, कमाल रू. ६ लाख प्रति युनिट, फिरत्या प्रक्रिया केंद्रासाठी २५ टक्के, कमाल रू. ६ लाख प्रति युनिट, पूर्वशीतकरण केंद्रासाठी २५ टक्के, कमाल रू. ६ लाख प्रति युनिट, हाताळणी व प्रतवारी केंद्रासाठी २५ टक्के रू. ३.७५ लाख तसेच घाऊक बाजारासाठी प्रकल्पाधारित अर्थसहायय दिले जाते. मात्र या बाबी बँक कर्जाशी निगडीत असतात.

शासनाच्या विविध कर्ज व अनुदान योजना

१. केंद्रपुरस्कृत पुष्पोत्पादन विकास योजना

झेंडू, शेवंती, ॲस्टर, निशिगंध, गुलाब अशा पारंपारिक फुलांबरोबर जरबेरा, कार्नेशन, गुलाब, ग्लॅडिओलस अशा अपारंपारिक फुलांची देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढती मागणी लक्षात घेता या फुलांच्या उत्पादनास प्रोत्साहन मिळावे यासाठी केंद्रशासनाच्यावतीने पुष्पोत्पादन विकास योजना राबवली जाते.

योजनेचे उद्देश

- पारंपारिक फुलशेतीबरोबरच अपारंपारिक फुलशेतीला प्रोत्साहन देणे.
- हरितगृहाचे तंत्रज्ञान वापरून निर्यातयोग्य फुलांचे उत्पादन वाढवणे.
- फुल उत्पादकांना शास्त्रोत्क व आधुनिक लागवड पद्धतीबाबत प्रशिक्षण देणे.
- फुलांच्या काढणीपच्यात तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण देणे.

क्षेत्रविस्तार

या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील फुलशेती उत्पादकांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी पारंपारिक तसेच अपारंपारिक फुलांच्या लागवडीसाठी अर्थसहाय्य दिले जाते. क्षेत्रविस्तार हा घटक राबवताना फुलपिकांची कांदापासून व बियाण्यांपासून लागवड करण्यासाठी स्वतंत्र प्रमाणके दिलेली असून त्यानुसार येणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. हे अनुदान ०.२० हेक्टर क्षेत्रासाठी दिले जाते.

कंदापासून क्षेत्रविस्तार

महाराष्ट्रात ग्लॅडिओलस, निशिगंध, लिलियम, डेलिया इ. फुलपिकांची लागवड कंदापासून केली जाते. या लागवडीसाठी हेक्टर १,००,००० इतके कंद लागतात. एका कंदासची सरासरी अंदाजे किंमत १.७५ रू. प्रति कंद असते. याशिवाय खते, किटकनाशके, बुरशीनाशके व इतर खर्च मिळून हेक्टरी साधारण २ लाख रू. इतका खर्च अपेक्षित असतो. ०.२० हेक्टर क्षेत्रासाठी सुमारे ०.४० लाख रू. इतका खर्च येतो. या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त ०.१० लाख रू. इतके अर्थसहाय्य ०.२० हेक्टर क्षेत्रासाठी दिले जाते.

बियाण्यांपासून लागवड

झेंडू, ॲस्टर, हेलिक्रायसन, गलार्डिया, झिनिया इ. फुलपिकांची लागवड बियाण्यांपासून केली जाते. या लागवडीसाठी साधारण हेक्टरी ५,०००० रू. इतक्या रकमेचे बियाणे लागते. खते, किटकनाशके, बुरशीनाशके,

इ.साठी ०.५५ लाख रू. इतका खर्च येतो. बियाण्याद्वारे ०.२० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी ०.१२ लाख रू. इतका खर्च अपेक्षित असतो. या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त ०.०३ लाख रू. इतके अर्थसहाय्य निविष्ठेच्या स्वरूपात फुलपिकांच्या बियाण्यापासून लागवडीसाठी दिले जाते.

उच्च तंत्रज्ञान केंद्रांना भेटी

महाराष्ट्रात पारंपारिक व अपारंपारिक फुलांचे उत्पादन घेऊ इच्छिणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना आधुनिक लागवड तंत्रज्ञानाबाबत व काढणीपश्चात तंत्रज्ञानाबाबत सखोल शास्त्रोत्क ज्ञान उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून प्रशिक्षण सहलीचे आयोजन केले जाते. १८ ते ४५ इतकी वयोमर्यादा असलेल्या एका प्रशिक्षणार्थी समुहासाठी ०.५० लाख रू. या मर्यादेत खर्च केला जातो. राज्यातील कृषी विद्यापीठ पुष्प संशोधन केंद्र, खाजगी पुष्पोत्पादन कंपन्या, लहान शेतकऱ्यांची यशस्वी हरितगृहे तसेच हरितगृहाबाहेरील यशस्वी लागवड व पुष्पोत्पादन संस्था इ. ना भेटी अयोजित केल्या जातात. प्रति लाभार्थी ठरवून दिलेल्या १,००० रू. इतक्या खर्चापेक्षा जादा होणारा खर्च लाभार्थीला स्वत:करावा लागतो.

फुलांच्या हाताळणीसाठी केंद्रसाठी अर्थसहाय्य

फुलांची योग्यरितीने हाताळणी केल्यास त्यांचे कमीत कमी नुकसान होऊन फुलांना चांगला बाजारभाव मिळतो. फुलांच्या पद्धतशीर हाताळणीसाठी ग्रेडिंग, पॅकिंग शेड, पॅकिंग टेबल, प्लॅस्टिक केट्स, पॅकिंग मटेरियल, वाहतुकीसाठी छोटी वाहने इ. मुलभूत सुविधा असणे गरजेचे असते. परदेशात मोठयाप्रमाणात फुलांची निर्यात करणाऱ्या राज्यातील मोठमोठया कंपन्यांनी राष्ट्रीय बागवानी मंडळ व अपेडा यांच्यामार्फत काढणीपश्चात सुविधा उपलब्ध करून घेतल्या आहेत. लहान हरितगृहातील उत्पादित होणारी फुले स्थानिक बाजारपेठेत विक्री करताना फार मोठया सुविधांची आवश्यकता नसते. त्यादृष्टीने या घटकाअंतर्गत लाभ मिळवता येतो.

सुमारे ५०० चौ. मी. ते १,००० चौ. मी. आकाराच्या हरितगृहांची उभारणी केलेल्या व हरितगृहाबाहेरील फुलांची लागवड केलेले फुलांचे उत्पादन या घटकाअंतर्गत ग्रेडिंग पॅकिंग शेड, पॅकिंग टेबल्स, प्लॅस्टिक क्रेट्स, पॅकिंग मटेरियल, वाहतुकिस छोटी साधने, योग्य साठवणूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी लाभ मिळवू शकतात. हाताळणी सुविधा निर्माण करण्यासाठी लाभ मिळवू शकतात. हताळणी सुविधा निर्माण करण्यासाठी सुमारे २ लाख रू. इतका खर्च अपेक्षित असून येणाऱ्या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त ०.५० लाख रू इतक्या मर्यादेत अर्थसहाय्य दिले जाते.

ही आर्थिक मदत बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरूपात दिली जाते. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची पाहणी व छाननी करून त्यांच्या अभिप्रायासह विभागीय कृषी सहसंचालक यांच्याकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर विभागीय कृषी स्तरावरील निवड समितीकडून लाभार्थीची अंतिम निवड करण्यात येते. सदर हाताळणी केंद्राचा प्रगती अहवाल वेळोवेळी आयुक्तालयासमोर सादर करावा लागतो. तसेच हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी झाल्यानंतर केंद्रशासनाच्या अर्थसहाय्याने अशा ठळक अक्षरांतील फलक दर्शनी भागात लावणे बंधनकारक असते.

फुलांच्या मूल्यवृद्धीसाठी अर्थसहाय्य

राज्यात कटफ्लॉवर्स तसेच इतर फुलांचे उत्पादन मोठयाप्रमाणात वाढत असून पुष्पोत्पादन हे व्यापारी शेतीसाठी अनुकूल क्षेत्र मानले जाते. पणनाच्या मागणी व पुरवठा नियमानुसार मागणी कमी असताना फुलांचे उत्पादन जास्त होऊन ते बाजारात विक्रीसाठी आल्यानंतर भाव कोसळण्याची शक्यता असते. अशास्थितीत फुलांची मूल्यवृद्धी हे तंत्र वापरून कोसळणाऱ्या बाजारभावावर नियंत्रण आणता येते.

या योजनेत सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसाहाय्य मिळवता येते. महिलांना या घटकांतर्गत विशेष प्राधान्य दिले जाते. गजरे, हार, बुके बनवणे, विविध समारंभासाठी व्यासपीठ सजविणे, मोठमोठया हॉटेलांतून पुष्परचना करणे, काही विशिष्ट फुलांवर प्रक्रिया करून सुकविलेल्या फुलांचे (ड्राय फ्लॉवर्स) उत्पादन करणे इ. साठी या

घटकांतर्गत लाभ मिळवता येतो. त्यासाठी व्यावसायिकास विक्रीसाठी शेडनेट उभारणे, बकेट्स, प्लॅस्टिकच्या क्रेटस्ची खरेदी करणे, झिरो एनर्जी चेंबरची उभारणी करणे, कात्र्या, सिकेटर्स, प्लॅस्टिक रॅपर्स इ. साहित्याची खरेदी करणे यासाठी अर्थसाहाय्य मिळू शकते.

निष्कर्ष

हरितगृह शेती पध्दती ही शे्ती क्षेत्रातील एक क्रांतीकारी वाटचाल असुन यामध्ये प्रतिकूल अशा नैसर्गिक परिस्थितीवर मात करून कृत्रिम वातातवरणात पिकांचे उत्पादन घेतले जाते, या शेती पध्दती मध्ये शासकिय अर्थसहाय्य, त्यमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध अशा योजना आहेत, यामध्ये शासनाच्या विविध कर्ज योजना या देशामध्ये सारख्याच प्रकारच्या आहेत व हरितगृहासाठी अनुदान योजना हया वेगवेगळया आहेत, विविध कर्ज व अनुदान योजना उपलब्ध असुनही आजही त्या शेतकऱ्यापयर्यंत तितक्या क्षमतेने पोहोचलेल्या नाहीत.

संदर्भ

१. महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी विकास प्रकल्प, हरितगृह तंत्रज्ञान व व्यवस्थापन २०१६
२. हरितगृह व फुलशेती व्यवस्थापन - स्वयंरोजगार पुस्तिका मिटकॉन
३. ग्रीन हाऊस तंत्रज्ञान - डॉ. शिवाजी ठोंबरे
४. ग्रीन हाऊस तंत्रज्ञान - डॉ. मोरे तुकाराम जगताप, कल्याण, रणपिसे श्रीमंत.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com